**अर्ज निशाणी क्रमांक १६ खालील आदेश**

**( पारीत केलेला दिनांक २५.०४.२०२३)**

**०१**. प्रस्तूत अर्ज प्रतिवादी क्रमांक ०१ ने त्याच्याविरुध्द दिनांक **१३.०२.२०२३** रोजीचा वादपत्रावरील "**विना कैफियत**" आदेश रद्द करण्यास **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१** नुसार दाखल केला.

**०२**. वादीने अर्जाला हरकत घेतली आहे.

**०३**. दोन्ही पक्षांतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**०४**. प्रतिवादी क्रमांक ०१ ने **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१ सह वाचनीय क्रम ०५ नियम ०१** नुसार तीस अगर नव्वद दिवसांच्या मुदतीत कैफियत दाखल केली नाही.

**०५.** दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादीला कैफियत दाखल करण्याची संधी नाकारल्यास त्याचे नुकसान होईल. प्रतिवादीला कैफियत दाखल करुन बचाव मांडण्याची संधी दिल्यास वादाचे कायमपणे निराकरण होण्यास मदत होईल. म्हणून **दिवाणी व्यवहार संहिता १९०८ चा क्रम ०८ नियम १०** नुसार दावा **"विना कैफियत"** चालवण्याचा झालेला आदेश **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१** अनुसार रद्द करणे उचित होईल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज **नि.क्र.१६** मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक ०१ विरुध्द वादपत्रावर दावा **"विना कैफियत"**चालवण्याचा झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2023.04.25 16:29:35 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**

**दिनांक :- २५.०४.२०२३.** **सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण :- औसा.** **जिल्हा लातूर.**